माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

अपील क्रमांक : ३०१६/२०२३

अपिलार्थी	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकारी
श्री. योगीनाथ सोमनाथ मेश्राम, मु. सुभाषवार्ड, पंकज मेश्राम यांच्या घरासमोर, (नहरा जवळ) वरठी (भंडारा रोड), ता. मोहाडी जि. भंडारा	सचिव, ग्राम पंचायत, वरठी, ता. मोहाडी जि. भंडारा	आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती, मोहाडी, ता. मोहाडी जि. भंडारा

अंतरिम आदेश दिनांक : १९.०१.२०२६

अंतीम आदेश दिनांक : २३.०६.२०२६

निर्णय

अपिलार्थी श्री. योगीनाथ सोमनाथ मेश्राम यांनी दिनांक ०९.११.२०२३ रोजी आयोगासमोर सादर केलेल्या व्दितीय अपीलावर आयोगाने दिनांक १९.०१.२०२६ रोजी सुनावणी घेवून पुढीलप्रमाणे अंतरिम आदेश पारीत केले आहे.

१. अपिलार्थी यांनी दिनांक २२.०६.२०२३ रोजी जोडपत्र-अ नुसार मागितलेली माहिती ही अनुज्ञेय ठरत असल्याने विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, वरठी, ता. मोहाडी जि. भंडारा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस सदर माहिती विनामुल्य नोंदणीकृत पोहच देय डाकेने पुरवावी व त्याची पोच आयोगास पाठवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही, त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, वरठी, ता. मोहाडी जि. भंडारा यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पोहचेल, याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती, मोहाडी, ता. मोहाडी जि. भंडारा यांनी सदर माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्याचे कारण सांगून माहिती निरंक समजण्यात यावी, असा आदेश पारीत केला आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) चा भंग झालेला

आहे. त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.के.मा.अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१.०३.२००८ व दि.१०.०६.२००८ च्या परिपत्रकानुसार तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस का करण्यात येवू नये, याचा खुलासा संबंधित तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर करावा.

४. वरील निष्कर्षावरुन प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाचे उपरोक्त अंतरिम आदेश दिनांक ०२.०२.२०२६ रोजी निर्गमित होवून सदर अंतरिम आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत वरठी, श्री. डी. आर. गभने यांनी दिनांक २४.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये आयोगास खुलासा सादर केलेला असून सदर खुलासा आयोगास दिनांक २७.०२.२०२६ रोजी प्राप्त झाला आहे. सदर लेखी खुलासा आयोगास पुढीलप्रमाणे सादर केला आहे.

"१. अर्जदार, श्री. योगिनाथ सोमनाथ मेश्राम यांनी त्यांच्या ज्या वैयक्तिक प्रकरणाकरीता ग्रामपंचायतीला अर्ज दिलेला होता. सदर प्रकरण खाजगी वादाचे असल्याने प्रकरणाची आवश्यक मौका चौकशी करणे आवश्यक होते. त्याकरीता मौका चौकशी पूर्वी अर्जदार, श्री. योगिनाथ मेश्राम व गैरअर्जदार, श्रीमती वैशाली संजय चव्हाण यांचेकडून त्यांच्या मालकी जागेचे वैयक्तिक पुरावे हे मागणी करण्यात आलेले आहेत.

अ. त्यात अर्जदार, श्री. योगिनाथ सोमनाथ मेश्राम यांनी दि. २५.०१.२०२३ ला आपले मालकी जागेचे विक्रीपत्र पुरावे सादर केले

ब. त्यात गैरअर्जदार श्रीमती वैशाली संजय चव्हाण यांनी दि. ०६.०२.२०२३ ला आपले मालकी जागेचे विक्रीपत्र पुरावे सादर केले.

२. सदर तक्रारीनुसार स्वत: मौक्यावर अर्जदार, गैरअर्जदार, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, पोलीस स्टेशनचे अधिकारी, पोलीस पाटील व इतर यांच्या समवेत मौका चौकशी करण्यात आली. त्यात अर्जदार व गैरअर्जदार यांचे लेखी बयान म्हणणे लिहिण्यात आले व मौका चौकशी पूर्ण करण्यात आली.

३. मौका चौकशीच्या निर्णयाची मुद्देनिहाय सविस्तर आदेश अर्जदार, गैरअर्जदार यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे व समाधान केलेले आहे.

४. अर्जदार श्री. योगिनाथ सोमनाथ मेश्राम यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दि. २२.०६.२०२३ रोजीच्या अर्जानुसार मौका चौकशीच्या आदेशामध्ये नमूद असलेले गैरअर्जदार, श्रीमती वैशाली संजय चव्हाण यांनी दि. ०७.०२.२०२३ रोजीचे म्हणणे सादर केले त्याची प्रत मागितली आहे. सदर अर्जदार, श्री. योगिनाथ सोमनाथ मेश्राम हे समजत असलेली प्रत बयान नसून गैरअर्जदार श्रीमती वैशाली संजय चव्हाण यांच्या मालकी जागेचे पुरावे विक्रीपत्र यासारखे अभिलेख आहेत.

५. सदर मालकी जागेचे पुरावे/विक्रीपत्र यासारखे अभिलेख माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने व वैयक्तिक असल्याने मी जन माहिती अधिकारी या नात्याने माझी खात्री झाल्याने माझेकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११ अन्वये गैरअर्जदार श्रीमती वैशाली संजय चव्हाण यांना अर्जानुसार माहिती पुरविण्याकरीता लेखी निवेदन सादर करण्यासाठी कळविण्यात आले होते.

गैरअर्जदार, श्रीमती वैशाली संजय चव्हाण यांनी त्यांचे त्यांनी सदर माहिती ही योगिनाथ सोमनाथ मेश्राम यांना माझे कोणतेही अभिलेख पुरविण्यात येऊ नये, असा लेखी निवेदन केले असल्याने माहितीचा अधिकार

अर्जदार, योगिनाथ सोमनाथ मेश्राम यांना दि. २२.०६.२०२३ रोजीच्या अर्जानुसार सदर माहिती ही त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक असून त्यांनी सहमती न दिल्याने पुरविता येणार नाही, असे उत्तर देण्यात आलेले आहे.

६. अर्जदार योगीनाथ सोमनाथ मेश्राम यांनी मा. प्रथम अपिलीय अधिकारी, पंचायत समिती मोहाडी यांचेकडे दाखल केलेल्या प्रथम अपीलामध्ये सुध्दा माहिती ही त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक दिसून येत असल्याने पुरविता येणार नाही, असा आदेश प्राप्त झालेला आहे.

अर्जदार यांचा पूर्वीचा अर्ज हा वैयक्तिक तक्रारी वादविवादाचे आहेत. अर्जदार यांचा वादविवादाचा तक्रार अर्ज ज्या विषयाशी संबंधीत होता. त्या विषयाचा निर्वाळा ग्रामपंचायतकडून करुन देण्यात आलेला आहे. त्यात कार्यालय या नात्याने मौका चौकशी करीता वैयक्तिक मालकी हक्काचे संबंधीत अभिलेख व हे माहितीचा अधिकार अर्जात नमूद करीत असलेले दि. ०७.०२.२०२३ गैरअर्जदार यांचे म्हणणे व माहिती मागितली आहे ते म्हणणे म्हणजेच गैरअर्जदार यांचे मालकी जागेबाबत विक्रीपत्र ई. अभिलेख आहेत व सदर माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्याने व विक्रीपत्र यासारखे मालकी पुराव्याची असल्याने व सदर माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची त्रयस्थ पक्षाची संबंधीत असल्याने व त्रयस्थ व्यक्तीला विचारणा करुन त्यांनी देण्यारकीता संमती न दर्शविल्याने पुरविण्यात आलेली नाही व सदर माहिती त्रयस्थ पक्षाची संबंधीत असल्याने अर्जदार यांना देणे अनुज्ञेय ठरत नाही, असा जन माहिती अधकारी या नात्याने माझ्या आकलन क्षमतेनुसार धारणा झाल्याने व प्रथम अपिलात तेच आदेश प्रापत झाल्याने उपलब करुन देण्यात आली नाही.

यात जन माहिती अधिकारी या नात्याने माहिती पुरविण्याकरीता माझा कोणतेही प्रकारचा दृष्ट हेतू नव्हता किंवा माहिती पुरविण्याकरीता टाळाटाळ करण्यात आलेली नाही व सदर माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची त्रयस्थ पक्षाची संबंधीत असल्याने असा माझा वैयक्तिक आकलन क्षमतेनुसार झालेली धारणा व ती चूकीची होत असल्यास मी मा. राज्य माहिती आयुक्त यांची माफी मागित असून मला माझ्या समजीला क्षमापन करण्यात यावे, व माझेवर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे अंतर्गत कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये. अशी नम्र व सविनय विनंती आहे."

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी, श्री. योगीनाथ सोमनाथ मेश्राम यांनी दिनांक ०९.११.२०२३ रोजी आयोगापुढे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जावर राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर आयोगासमोर दिनांक १९.०१.२०२६ रोजी सुनावणी घेवून अंतरिम आदेश पारीत करण्यात आले होते. सदर आयोगाचे अंतरिम आदेश दिनांक ०२.०२.२०२६ रोजी निर्गमित होवून सदर आदेशानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८.०५.२०२६ रोजीच्या पत्रान्वये गैरअर्जदार, श्रीमती वैशाली संजय चव्हाण यांनी ग्रामपंचायतला दिनांक ०७.०२.२०२३ रोजी सादर केलेल्या पत्राची माहिती अपिलार्थीस स्पीड पोस्टाद्वारे उपलब्ध करुन दिलेली असून त्याची पोच आयोगास सादर केलेली आहे.

मात्र, द्वितीय अपील आदेशात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, वरठी, ता. मोहाडी जि. भंडारा व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती, मोहाडी, ता. मोहाडी जि. भंडारा यांनी सदर माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्याचे कारण सांगून माहिती का नाकारली? याचा लेखी खुलासा मागविण्यात आला होता. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत वरठी, श्री. डी. आर. गभने यांनी त्यांचा लेखी खुलासा आयोगास सादर केलेला असून त्यांचे म्हणणे मान्य करीत झालेला विलंब

क्षमापित करुन सदर खुलासा मान्य करण्यात येत आहे. सबब, प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.

आदेश

प्रस्तुत व्दितीय अपील अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : २३.०६.२०२६

24 JUN 2026

जावक क्रमांक ५५३२ दिनांक ----------